दैनिक
इनशॉट जळगाव
मंगळवार दि.२२ एप्रिल २०२५



## न्यूज ब्रिफ

### मका घेऊन जाणारे ट्रॅक्टर उलटले ; शेतकऱ्याचे नुकसान !

**धरणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुसळी फाट्याजवळील उड्डाणपुलाखालील बोगद्यात पाळधी येथून पिंप्री खुर्द येथे मका विक्रीसाठी घेऊन जाणारे ट्रॅक्टर समोरून अचानक वाहन आल्याने उलटले. ही घटना शनिवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास घडली. या अपघातात शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, चोपडा रस्त्यावरील उड्डाणपुलाजवळ मुसळी फाटा येथे पुलाखालून जात असलेले मक्याचे ट्रॅक्टर वळत असताना समोरून धरणगावकडून अचानक वाहन आल्याने उलटले. याठिकाणी गतिरोधक नसल्याने वाहने सुसाट धावतात. त्यामुळे रोज किरकोळ अपघात होत आहेत. एखाद्या वेळेस मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.

वराडकडे जाताना व जळगावकडून येताना वाहने भरधाव वेगाने धावतात. पुलाखालील रस्त्यावर गतिरोधक नसल्यामुळे रोज छोटे-मोठे अपघात होत आहेत. शनिवारी दुपारी १ वाजता मक्याने भरलेला ट्रॅक्टर पुलाखाली उलटला. याठिकाणी बाजूला असलेला उसाच्या रस विक्रेता सुदैवाने बचावला.

शेतकऱ्याने हा मका पुन्हा भरून विक्रीसाठी रवाना केला. मात्र, या घटनेमुळे शेतकऱ्याला खूप त्रास सहन करावा लागला.

## महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या जळगांव जिल्हा नूतन कार्यकारिणी जाहीर

# राज्य कार्यकारिणी सदस्यांचा सत्कार



जळगाव : प्रतिनिधी

महाराष्ट्र योगशिक्षक संघाच्या जळगाव जिल्हा समितीच्या वतीने रविवार २० एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता नवनियुक्त कार्यकारिणीच्या सत्कार सोहळ्याचे आणि सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास जिल्ह्यातील अनेक योगशिक्षक, पदाधिकारी व योगप्रेमी उपस्थित होते. सुरुवातीला ओंकार आणि महामुनी पतंजली यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्रिवार ओंकार आणि गुरुवंदनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

महासचिव पांडुरंग सोनार यांनी मागील बैठकीचा अहवाल तसेच प्रोसिडिंग बुकमधील नोंदी वाचून दाखवल्या. कोषाध्यक्ष नूतन जोशी यांनी आर्थिक स्थितीचा सविस्तर आढावा सादर केला. यानंतर मागील वर्षभर कार्यरत असलेल्या मावळत्या कार्यकारिणीचे विशेष अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्वांना सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.

नवीन कार्यकारणी सदस्यांचा झाला सत्कार

चित्रा महाजन - जिल्हाध्यक्ष, डॉ. शरयू विसपुते - उपाध्यक्ष, पांडुरंग सोनार - महासचिव, नूतन जोशी - कोषाध्यक्ष सोनाली पाटील - सचिव, अर्चना गुरव - सचिव, वैशाली भारंबे - सहसचिव, प्रिया दारा - संघटन सचिव, जितेंद्र कोतवाल - मिडीया प्रभारी, रोहन चौधरी - सोशल मिडीया प्रभारी, कविता चोपडे - कार्यालय सचिव, ॲड.स्वाती निकम - महिला प्रकोष्ठ प्रभारी

या प्रसंगी नव्याने महाराष्ट्र योगशिक्षक संघाच्या मुख्य कार्यकारिणीत नियुक्त झालेल्या प्रा. कृणाल महाजन, सुनील गुरव, प्रा. डॉ. देवानंद सोनार, अरविंद सापकर आणि चित्रा महाजन यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. त्यांना स्मृतिचिन्ह देवून गौरवण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संघटनात्मक कार्य, योग शिक्षणाचा प्रसार व भविष्यातील योजना यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव अर्चना गुरव यांनी अत्यंत सुबकपणे आणि उत्साही पद्धतीने केले. त्यांचे विशेष (पान २ वर)

# महिलेचे मंगळसूत्र चोरट्यांनी लांबविले !

जळगाव : प्रतिनिधी

मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या एमएसईडीसीएल सहाय्यक अभियंत्याच्या गळ्यातून १ लाख ९० हजार रुपयांचे २७ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र दुचाकीवरुन आलेल्या चोरट्याने जबरीने ओढून नेले. त्या महिलेने चोरट्याचा शिवाजीनगर उड्डाणपुलापर्यंत पाठलाग केला, मात्र तो चोरटा पसार झाला. ही घटना दि. २० रोजी सकाळी पावणेसात वाजेच्या सुमारास खडके चाळ जवळ घडली. याप्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

सविस्तर वृत्त असे कि, शहरातील शिवाजी नगरातील आरशीवाला अपार्टमेंटमध्ये रत्ना किरण पाटील (वय ४३) या वास्तव्यास असून त्या एमएसईडीसीएल येथे सहाय्यक अभियंता पदावर नोकरीस आहे. दि. २० रोजी पावणेसहा वाजेच्या सुमारास नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉक करण्यासाठी सुरत रेल्वे गेटजवळील साईबाबा मंदिरापर्यंत गेल्या. तेथून घराकडे परत येत असतांना खडकेचाळजवळील हनुमान मंदिरासमोरुन जात होत्या. यावेळी सुरत रेल्वेगेटकडून दुचाकीवरुन आलेल्या चोरट्याने रत्ना पाटील यांच्या गळ्यातून सोन्याचे मंगळसूत्र जबरीने ओढून तो पळून जावू लागला. सहाय्यक अभियंता असलेल्या रत्ना पाटील यांनी आरडाओरड केली, मात्र तो (पान २ वर)

# भरधाव बसची दुचाकीला जबर धडक : पत्नी ठार तर पती गंभीर !

जळगाव : प्रतिनिधी

शेतात जाणाऱ्या दाम्पत्याच्या मोटरसायकलला भरधाव वेगाने येणाऱ्या बसने धडक देऊन फरफटत नेले. या अपघातात महिला ठार झाली असून तिच्या पतीची प्रकृती चिंताजनक आहे. सविस्तर वृत्त असे कि, अमळनेर तालुक्यातील गडखांब येथील मुरलीधर रामचंद्र पाटील व लता मुरलीधर पाटील हे दोघे मोटरसायकलवर शेतात दहिवदकडे जाताना समोरून चोपड्याकडून अमळनेरकडे येणाऱ्या यावलच्या बस क्रमांक एम.एच.२० बी.एल २६५६ ने जोरदार धडक देऊन मोटरसायकलसह पती पत्नीला तब्बल १०० मीटर फरफटत नेले. मोटरसायकल बस खाली आल्याने नागरिकांच्या मदतीने दोघांना बाहेर काढण्यात आले. लताबाई गंभीर जखमी झाली होती. १०८ रुग्णवाहिकेचे डॉ. इम्रान कुरेशी यांनी दोघांवर (पान २ वर)

# किरण सुर्यवंशी "कृषी रत्न आदर्श युवा शिखर आयकॉन अवार्ड" पुरस्काराने सन्मानित



पाचोरा : प्रतिनिधी

तालुक्यातील बांबरुड (राणीचे) येथील किरण अशोक सुर्यवंशी यांनी कला शाखेतील पदवी व डी. एड शिक्षण नोकरी च्या मागे न लागता शेती करण्यावर भर दिला. शेतीची आवड असल्याने किरण अशोक सुर्यवंशी यांची नेहमीच विविध प्रयोग करून त्यांनी विविध पिकांचे अधिकाधिक उत्पादन घेण्याचा प्रयत्न करत असून.किरण च्या वडीलांचे सांगने आहे की "नोकर न बनता ,मालक बना" हे उदिष्ट डोळ्यासमोर ठेऊन किरण अशोक सुर्यवंशी हा शेती क्षेत्रात प्रयत्नशील आहेत. किरण अशोक सुर्यवंशी यांच्या कार्याची दखल घेऊन शिव स्वराज बहुउद्देशीय संस्था (पुनतगाव ता. नेवासा,जि, अहिल्याबाई नगर)तर्फे त्यांना दि. २० एप्रिल रोजी महामानव विश्व रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीनिमित्त राज्यस्तरीय "कृषी रत्न आदर्श युवा शिखर आयकॉन अवार्ड" (पान २ वर)

# रेल्वेतील फुकट्या प्रवाशांकडून पैसे उकळणाऱ्या आरोपींना अटक !

भुसावळ : प्रतिनिधी

भुसावळ रेल्वे विभागाने राबवलेल्या तिकीट तपासणी मोहिमेत अजब प्रकार समोर आला आहे. विनातिकीट प्रवाशांकडून पैसे वसूल करणाऱ्या बनावट सात लिनेन बॉय (चादर, गाद्या पुरवणारे कर्मचारी) यांना पकडण्यात आले. रविवारी कामाख्या एक्सप्रेसमध्ये मनमाड ते भुसावळ या दरम्यान हा प्रकार उघडकीस आला. या तिकीट तपासणी मोहिमेत १३२ प्रवाशांकडून पावणेचार लाख रुपये वसूल करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, शफीकुल, तयजुल इस्लाम, फारुकुद्दीन, सईदुल इस्लाम, रफिकुल इस्लाम, सद्दाम हुसैन आणि हबीब अली अशी अटक करण्यात आलेल्या बनावट लिनेन बॉयची नावे आहेत. वाणिज्य विभाग व रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) यांच्या पथकाने ट्रेन क्र. १२५१९ लोकमान्य टिळक टर्मिनस-कामाख्या (एलटीटी-कामाख्या) एसी एक्स्प्रेसमध्ये मनमाड ते (पान २ वर)

# भाजपा मंडल क्रमांक 3 च्या अध्यक्षपदी अजित राणे



जळगाव : प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीची राष्ट्रीय , प्रदेश,स्तरापासून ते जिल्हा ,शहर ,महानगर स्तरावर संघटनात्मक रचना प्रणाली सुरू असून या अंतर्गत भाजप जळगाव जिल्हा महानगराच्या अंतर्गत असलेल्या नवीन रचनेनुसार मंडळ क्रमांक ३ च्या सरदार वल्लभभाई पटेल नगराच्या मंडल अध्यक्षपदी गेल्या दहा वर्षापासून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व यापूर्वी सुद्धा मंडळ अध्यक्षांची जबाबदारी सांभाळणारे युवा नेतृत्व सामाजिक कार्यकर्ते अजित राणे यांची आज दिनांक 20 एप्रिल रविवार रोजी सायंकाळी ५ वाजता शिवबजरंग दत्त मंदिर यशवंत नगर येथे मंडल निवडणूक प्रमुख प्रदीप रोटे सहनि निवडणूक प्रमुख जयेश भावसार यांच्या प्रमुख उपस्थितीत अजित राणे यांची सरदार वल्लभ भाई पटेल मंडल क्र ३ च्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली त्यांच्या या निवडीबद्दल प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण मा ना गिरीश भाऊ महाजन केंद्रीय राज्यमंत्री रक्षा ताई खडसे मा ना संजयजी सावकारे प्रदेश संघटन मंत्री (पान २ वर)

# जिल्ह्यातील ९ तालुक्यांना मिळणार परशुरामांची मूर्ती



जळगाव : प्रतिनिधी

जिल्ह्याचे ठिकाणी यंदा श्री परशुराम जन्मोत्सवाचे १६ वे वर्ष असल्याने यंदा पासुन सर्व तालुक्याच्या ठिकाणी ब्राह्मण समाज एकत्रीत येत श्री परशुराम जन्मोत्सव साजरा करणार आहे. विषेश म्हणजे यंदा ९ तालुक्यांना बहुभाषिक ब्राह्मण संघाचे वतीने मुर्ती वितरीत करुन भव्य दिव्य मूर्तीसह भगवान परशुराम जन्मोत्सव मिरवणूक प्रत्येक ठिकाणी निघणार आहे. सर्व तालुक्यात मूर्ती तालुक्याला वितरित करण्यात येत असल्याने समाज बांधवांमध्ये खुप उत्साह आहे.

भगवान परशुरामांच्या मुर्तीचे फायबर काम कामआकोला येथे संजय टेंट चे हरीष शर्मा व जळगावी मुर्तीकार नंदन महाजन आसोदा हे करीत असल्याची माहिती अध्यक्ष आर्किटेक्ट नितीन पारगावकर यांनी दिली. सदर संकल्पना राजेश नाईक पुर्णत्वास नेत आहे. भगवान परशुर्मांची साडे सहा फूट उंच मूर्ती फायबर रेजीनची मूर्तीत पिळदार शरीर यस्टी, तेजपुंज तेजस्वी निग्रही चेहरा असा सर्वांचा मिलाफ आहे. ज्यामुळे मुर्तीकडे पाहताच रहावे असे वाटुन भाविकांचे हात (पान २ वर)

# आरोग्य शिबिरात शेकडो नागरिकांनी घेतला सहभाग

## विचार वारसा फाउंडेशनतर्फे शिवनेरी हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने




जळगाव : प्रतिनिधी

येथील विचार वारसा फाउंडेशनतर्फे शिवनेरी हॉस्पिटलच्या सहकार्याने हाडांचा ठिसूळपणा व कमकुवतपणा या विषयावर भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिरामध्ये २१५ नागरिकांनी सहभाग घेऊन आरोग्याविषयी माहिती जाणून घेतली.

सुरुवातीला डॉ. शंतनू भारद्वाज यांचा आरोग्यसेवेबद्दल सन्मान करण्यात आला. यानंतर सर्व वयोगटातील नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली. यामध्ये हाडांचा ठिसूळपणा, कमकुवतपणा, संधिवात, कंबरदुखी, पाठदुखी, सांधेदुखी, थकवा इत्यादी आजारांबाबत नागरिकांनी तपासणी केली. या वेळेला आवश्यक रुग्णांना मोफत औषधींची व्यवस्था करण्यात आली होती. तर काही नागरिकांची मोफत फुल बॉडी स्कॅन करण्यात आली.

प्रसंगी हाडांचे आरोग्य निरोगी कसे ठेवावे याबाबत डॉ. शंतनू भारद्वाज यांनी माहिती दिली. विचार वारसा फाउंडेशनचे अध्यक्ष विशाल देशमुख यांनी नागरिकांच्या निरामय आरोग्यासाठी दर महिन्याला आरोग्य तपासणी शिबिर घेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी नगरसेवक आशुतोष पाटील, अभेद फाउंडेशन अध्यक्ष वैशाली झाल्टे,जगतगुरु महिला बचत गट अध्यक्ष अलका देशमुख, मंगला मराठे,देवका हरणे आदी उपस्थित होते सूत्रसंचालन तुळजाई फाउंडेशन अध्यक्ष भूषण लाडवंजारी यांनी केले. कार्यक्रमासाठी अक्षय गवई,निखिल शेलार,राहुल सोले,संकेत म्हस्कर,प्रफुल सुर्यवंशी, मंगेश मांडोळे,मयुर डांगे आदींनी परिश्रम घेतले.